Vol 3 Issue 2 March 2013

Impact Factor : 0.2105

ISSN No : 2230-7850

## Monthly Multidisciplinary Research Journal

# *Indian Streams Research Journal*

Executive Editor

Ashok Yakkaldevi

Editor-in-chief

H.N.Jagtap

**IMPACT FACTOR : 0.2105**

**Welcome to ISRJ**

**RNI MAHMUL/2011/38595** **ISSN No.2230-7850**

Indian Streams Research Journal is a multidisciplinary research journal, published monthly in English, Hindi & Marathi Language. All research papers submitted to the journal will be double - blind peer reviewed referred by members of the editorial Board readers will include investigator in universities, research institutes government and industry with research interest in the general subjects.

## International Advisory Board

Flávio de São Pedro Filho
Federal University of Rondonia, Brazil

Kamani Perera
Regional Centre For Strategic Studies, Sri Lanka

Janaki Sinnasamy
Librarian, University of Malaya [ Malaysia ]

Romona Mihaila
Spiru Haret University, Romania

Delia Serbescu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Anurag Misra
DBS College, Kanpur

Titus Pop

Mohammad Hailat
Dept. of Mathmatical Sciences, University of South Carolina Aiken, Aiken SC 29801

Abdullah Sabbagh
Engineering Studies, Sydney

Catalina Neculai
University of Coventry, UK

Ecaterina Patrascu
Spiru Haret University, Bucharest

Loredana Bosca
Spiru Haret University, Romania

Fabricio Moraes de Almeida
Federal University of Rondonia, Brazil

George - Calin SERITAN
Postdoctoral Researcher

Hasan Baktir
English Language and Literature Department, Kayseri

Ghayoor Abbas Chotana
Department of Chemistry, Lahore University of Management Sciences [ PK ]

Anna Maria Constantinovici
AL. I. Cuza University, Romania

Horia Patrascu
Spiru Haret University, Bucharest, Romania

Ilie Pintea,
Spiru Haret University, Romania

Xiaohua Yang
PhD, USA

Nawab Ali Khan
College of Business Administration

## Editorial Board

Pratap Vyamktrao Naikwade
ASP College Devrukh,Ratnagiri,MS India

R. R. Patil
Head Geology Department Solapur University, Solapur

Rama Bhosale
Prin. and Jt. Director Higher Education, Panvel

Salve R. N.
Department of Sociology, Shivaji University, Kolhapur

Govind P. Shinde
Bharati Vidyapeeth School of Distance Education Center, Navi Mumbai

Chakane Sanjay Dnyaneshwar
Arts, Science & Commerce College, Indapur, Pune

Awadhesh Kumar Shirotriya
Secretary, Play India Play (Trust),Meerut

Iresh Swami
Ex - VC. Solapur University, Solapur

N.S. Dhaygude
Ex. Prin. Dayanand College, Solapur

Narendra Kadu
Jt. Director Higher Education, Pune

K. M. Bhandarkar
Praful Patel College of Education, Gondia

Sonal Singh
Vikram University, Ujjain

G. P. Patankar
S. D. M. Degree College, Honavar, Karnataka

Maj. S. Bakhtiar Choudhary
Director,Hyderabad AP India.

S.Parvathi Devi
Ph.D.-University of Allahabad

Sonal Singh

Rajendra Shendge
Director, B.C.U.D. Solapur University, Solapur

R. R. Yalikar
Director Managment Institute, Solapur

Umesh Rajderkar
Head Humanities & Social Science YCMOU, Nashik

S. R. Pandya
Head Education Dept. Mumbai University, Mumbai

Alka Darshan Shrivastava
Shaskiya Snatkottar Mahavidyalaya, Dhar

Rahul Shriram Sudke
Devi Ahilya Vishwavidyalaya, Indore

S.KANNAN
Ph.D , Annamalai University,TN

Satish Kumar Kalhotra

**Address:-Ashok Yakkaldevi 258/34, Raviwar Peth, Solapur - 413 005 Maharashtra, India**
**Cell : 9595 359 435, Ph No: 02172372010 Email: ayisrj@yahoo.in Website: www.isrj.net**

Indian Streams Research Journal
Volume 3, Issue. 2,March. 2013
ISSN:-2230-7850

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# अन्नधान्य सुरक्षा आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक वितरण प्रणाली

शिंदे एस . आर .

रयत शिक्षण संस्थेचे,
कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, मोखाडा जि . ठाणे .

*सारांशः*

भारतासारख्या विकसनशिल देशाला अन्नधान्याची सुरक्षा ही आजची गरज आहे . कारण वाढती लोकसंख्या आणि मर्यादित लागवडीखालील भुक्षेत्र यामुळे तुलनात्मकदृष्टया अन्नधान्याची दुर्मिळता त्यातल्यात्यात अकार्यक्षम वितरण प्रणाली यामुळे भुकबळी सारख्या समश्या या देशाला सातत्याने भेडसावत आहेत . त्याचाच परीणाम म्हणुन भारतात कुपोषित बालकांच्या प्रमाणात घट न होता वाढ होत आहे . आज भारतात **0** ते **6** या वयोगटातील एकुण बालकात **48** टक्के बालके कुपोषित असल्याचे दिसुन आले आहे . जे इतर देशाच्या तुलनेत जास्त आहेत . माल्थसच्या सिध्दांतानुसार लोकसंख्याच्या तुलनेत अन्नधान्यातील वाढ कमी गतीने होत असते . (समग्र जागतीक पातळीवर) त्यातुन अनेक समश्य निर्माण होत असतात . भारतात स्वातंज्येत्तर काळात विशेषत **1966 - 67** नतंर शेतीक्षेत्राने कमालीची प्रगती केली . एकुणच अन्नधान्याच्या उत्पादनाबरोबरच इतर शेती उत्पादनात प्रचंड वाढ झाली . ऐके काळी इतर देशातुन आयात करीत असलेल्या अन्नधान्यावर प्रतिबंध तर बसलाच शिवाय आपण दुस-या देशांना शेती उत्पादनाची निर्यात करू लागलो . अर्थातच आपण अन्नधान्याच्या बाबतीत स्वंयपुर्ण झालो . स्वंयपुर्ण होण्याचा अर्थ परकीय चलनाची बचत होते जे आपण करत आहोत .

**प्रस्तावना -**

मुबलक अन्नधान्याची उपलब्धता असली तरी ते देशातील गरीब लोकांपर्यत पोहचू शकत नसल्यामुळे लोक उपासमारीने अर्थात भुकबळीने मरत आहेत . त्यावर उपाय म्हनुन शासनाने अन्नधान्य सुरक्षा बिल संसदेत मांडून लोकांना पर्याप्त धान्याची उपलब्धता करून देण्याचा प्रयत्न करीत आहे .

**अन्नधान्य सुरक्षा म्हणजे काय :**

जागतीक विकास अहवालात म्हटले आहे की, " अन्नधान्याची सुरक्षा म्हणजे सर्व लोकांना सुदृढ आरोग्यदायी जीवनासाठी आवश्यक असलेल्या पुरेशा अन्नधान्याची कोणत्याही वेळी होऊ शकेल अशी उपलब्धता होय . "

Food Agriculture Organisation (FAO) ने म्हटले आहे की " अन्नधान्य सुरक्षा म्हणजे सर्व लोकांना कोणत्याही वेळी भौतिक व आर्थिक दृष्टया सहज प्राप्त होऊ शकेल अशा मुलभुत अन्नधान्याची सार्वत्रिक उपलब्धता होय . "

वरील व्याख्यावरून असा असा निष्कर्ष काढता येतो की अन्नधान्याची सुरक्षा म्हणजे कोणत्याही वेळी सर्व लोकाना आर्थिकदृष्टया परवडेल अशा किमतीत सकस असा अहार मिळणे होय . हा प्रत्येक नागरिकांचा संविधानात्मक अधिकार आहे . शिवाय ते लोकांना उपलब्ध करून देण्याची सरकारची मोठी जबाबदारीसुध्दा आहे . लोकांना परवडेल अशा किमान किमतीला अन्नधान्याचा पुरवठा करून देण्याची तसेच पात्र लोकांपर्यत पोहंचण्यासाठी सार्वजनिक वितरण व्यवस्था निर्माण केली गेली . त्यामुळे ख-या अर्थाने अन्नसुरक्षा कायदयांची प्रत्यक्ष अमलबंजावणी होण्यास मोठी मदत झाली आहे .

**सार्वजनिक वितरण व्यवस्था**

दारिद्रये रेषेखालील लोकांना या व्यवस्थेच्या माध्यमातुन अनुदानीत किंमतीवर मुलभुत वस्तुंचा पुरवठा केला जाते . या व्यवस्थेमुळे गहु ,तांदुळ, रॉकेल, खाद्यतेल यासारख्या मुलभुत वस्तु अनुदानीत तत्वावर पुरवल्या जातात . म्हणुन या योजनेस कल्याणकारी योजना असेही म्हणतात . भारतात **1960** मध्ये **47** हजार रास्त भावाची दुकाने होती त्यात वाढ होऊन **2000** मध्ये **4 . 7** लाख झाली . वर्तमान काळात महाराष्ट्रात सार्वजनिक वितरण व्यवस्थेत रेशन दुकानाची संख्या मोठया प्रमाणात असल्याचे दिसुन येते . महाराष्ट्रात ज्या रेशन दुकानाची विभागणी केली जाते ती आदिवाशी व बिगर आदिवाशी दुकाने . त्यात **4632** रेशन दुकाने ही आदिवाशीच्या मालकीची आहेत तर **46013** दुकाने ही बिगर आदिवाशीच्या मालकीची आहेत .

या व्यवस्थेच्या माध्यमातुन दुष्काळग्रस्त राज्यांना धान्याचा पुरवठा करता यावा म्हणुन महाराष्ट्र शासनाने केंद्रकडे **88** हजार मेट्रीक टन धान्याची मागणी केली आहे . असे राज्याचे मुख्य सचिव जयवंतकुमार बाठिया यांनी सागितले .

**उद्दिष्टये**

**1** . अन्नसुरक्षा कार्यकमामुळे दारिद्रये रेषेखालील लोकांना फायदा होत आहे का याचा अभ्यास करणे .
**2** . एकीकडे अन्नधान्याचा मुबलक पुरवठा होत असताना दुसरीकडे लोक उपासमारीने मरत आहेत याला नेमके कोणते कारण आहे याचाही अभ्यास करणे .

**Title :** अन्नधान्य सुरक्षा आणि महाराष्ट्रातील सार्वजनिक वितरण प्रणाली
**Source:Indian Streams Research Journal [2230-7850 ]** शिंदे एस . आर . **yr:2013 vol:3 iss:2**

**संशोधन पध्दती**

प्रस्तुत संशोधन दुय्यम साधनावर अवलबुंन असुन शासनाकडुन प्रकाशित झालेल्या वेगवेगळया कागदपत्रांची मदत प्रस्तुत संशोधकाने घेतली आहे .

**गृहीते**

1 . अन्नसुरक्षा कार्यक्रम चांगला आहे . परंतु त्याची अमलबंजावणी करणारी प्रशासन यत्रंणा अकार्यक्षम आहे . म्हणुन गरजू लोकांपर्यत अन्नधान्य पोहचु शकत नाही . म्हणुन कुपोषण, दारिद्रये कमी न होता वाढत आहे .

महाराष्ट्र शासन गरीबाना मुबलक स्वरूपात अन्नधान्य मिळावे म्हणुन रोजगार कार्यक्रम ज्यात दुष्काळी भागासाठी हा कार्यक्रम सरकारने 15 ऑगस्ट 2001 रोजी हा कार्यक्रम, अन्नासाठी काम यासारख्या महत्वपुर्ण योजना सुरू केल्या आहेत . तसेच अंत्योदय योजना ज्यात दारिद्रयेरेषेखालील कुटुंबाना दरमहा 2 रू . किलो गहु, व तादुंळ 3 रू किलो दराने प्रत्येक कुटुंबाना दरमहा 35 अन्नधान्य देते . शिवाय अन्नपुर्णा योजना ज्यात वयोवृध्दासाठी ग्राममंत्रालयाने ही योजना 2001 मध्येच सुरू केली या योजनेनुसार वृध्दाना तसेच निवृत्ती धारकांना दरमहा 10 किग्रॅ अन्नधान्य मोफत उपलब्ध करून करून दिले जाते . या योजनेमुळे ग्रामीण भागातील दारिद्रये कमी होण्यास आणि वेळेवर अन्नधान्याची उपलब्धता होण्यास या योजनामुळे मदत झालेली आहे . अंत्योदय आणि दारिद्रये रेषेखालील लोकांना शासनाकडुन मुबलक धान्याचा पुरवठा झालेला दिसुन येता . खालील तक्त्यात याची कल्पना येते . आकडेवारी मे . टनात . (कालावधी सन 2012 - 2013) तक्ता क्र . 1

| अन्नधान्य | अंत्योदय व बी . पी . एल . (पिवळे शिधापत्रिकाधारक) | | | एपीएल केशरी शिधापत्रिकाधारक |
|---|---|---|---|---|
| | अंत्योदय | बी . पी . एल . | एकुण | |
| तांदूळ | 42515 | 68673 | 111188 | 18430 |
| घहु | 43725 | 73779 | 117504 | 93500 |
| एकुण | 86240 | 142452 | 228652 | 111930 |

स्त्रोत : वेब साईड - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग महाराष्ट्र शासन

वरील तक्त्यावरून असे दिसुन येते अंत्योदय योजनेतील लोकांना 2012 13 या आर्थिक वर्षात एकुण 86240 मेट्रीक टन धान्याचे वाटप झाले . त्यात 42515 मे . टन तांदूळ तर 43715 मे . टन गव्हाचे वितरण करण्यात आले . तसेच दारिद्रये रेषेखालील कुटुंबानादळाचे वाटप करण्यात आले . एकुणच या वर्यात पिवळे कार्डधारकांना 228652 मे . टन धान्याचे वितरण करण्यात आले . तर केशरी कार्डधारकाना या वर्षी 111930 मे . टन धान्याचे वाटप करण्यात आले .

सुप्रिम कोर्टाच्या अदेशानुसार महाराष्ट्रातील 11 जिल्ह्याची अतिगरीब तसेच अति मागास जिल्हे म्हणुन निवड करण्यात आली . निवडलेल्या जिल्हयातील अतिरीक्त दारिद्रये रेषेखालील व्यक्तिची निवड करून त्याना अन्नधान्याचे वाटप करण्यात आले . सदर धोरणाचा कोणत्या जिल्ह्याला व किती लोकांना फायदा झाला याचे विश्लेषण खालील तक्त्यात केलेले आहे .

कालावधी ऑक्टोबर 2011 ते सप्टेंबर 2012तक्ता क्र . 2

| अ . क्र . | जिल्हे | अतिरीक्त दारिद्र्येरेषेखालील लोकांना मिळणा-यांची लाभार्थिंची संख्या | वितरण (मे . टन) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | गहू | तांदुळ | एकुण |
| 1 | अहमदनगर | 28314 | 587 | 403 | 990 |
| 2 | धुळे | 16017 | 333 | 228 | 561 |
| 3 | नंदुरबार | 11932 | 135 | 283 | 418 |
| 4 | औरंगाबाद | 23233 | 481 | 331 | 812 |
| 5 | हिगोंली | 7008 | 145 | 100 | 245 |
| 6 | नांदेड | 16379 | 340 | 233 | 573 |
| 7 | यवतमाळ | 15214 | 315 | 217 | 532 |
| 8 | भंडारा | 8816 | 100 | 209 | 309 |
| 9 | गोंदीया | 10981 | 123 | 261 | 384 |
| 10 | चंद्रपूर | 12478 | 200 | 237 | 437 |
| 11 | गडचिरोली | 4942 | 56 | 119 | 175 |
| एकुण | | 155314 | 2815 | 2661 | 5436 |

स्त्रोत : वेब साईड - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग महाराष्ट्र शासन

वरील तक्त्यात सुप्रिम कोर्टाच्या आदेशाचा फायदा महाराष्ट्रातील वरील 11 जिल्ह्यांना झाला आणि महत्वाचे म्हणजे ज्यांना अन्नधान्याची खरच गरज आहे अशानाच याचा पुरवठा केला गेला . अर्थात जे अंत्योदय व बीपीएल चे सदस्य आहेत त्यांना सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या माध्यमातुन अन्नध्याचा पुरवठा केला केला . असे असले तरी महाराष्ट्रात मागास व अति गरीब जिल्ह्यांची निवड कोणत्या निकषावर केली गेली हे समजत नाही . या 11 जिल्ह्याशिवाय आजुनही काही जिल्ह्ये असे आहेत की त्या जिल्ह्यातील एकुण लोकसंख्याच्या (ग्रामीण व दुर्गम भागातील ) जवळजवळ 90 टक्के लोक दारिद्रये रेषाखाली आहेत व त्यांना पोष्टीक अहार तर जावू द्या दिवसाला दोनवेळचे जेवण मिळेल की नाही याची शास्वती नसते . उदा . ठाणे जिल्ह्यातील अदिवासी भाग . या भागातील लोकांचे दरडोई दरमहीन्याला सरासरीने

रू . 300 ते 500 उत्पन्न असते . स्वत :चे पुर्ण अंग झाकण्यासाठी कपडा मिळत नाही, रोजगार नाही, कोणत्याच प्रकारच्या सुखसोई नाहीत, रस्ते, दळणवळणाच्या सोयी नाहीत अशा जिल्ह्याला अति मागासलेला जिल्ह्या जाहिर करू नये यापेक्षा मोठे दुर्दैव कोणतेच नाही . शासनाच्या आकडेवारीनुसार (1 . 4 . 2012 ) ठाणे जिल्ह्यात 160664 बीपीएल आणि 128901 अंत्योदय पिवळया शिधापत्रिका कार्यरत होत्या अर्थात एवढे कुटुबे दारिद्रये रेषेखाली जिवन जगत होते . तर एकुण 702435 शिधापत्रिका व त्यांची संख्या ठाणे जिल्ह्यांत होती .

शासनाच्या अकार्यक्षम व्यवस्थापनामुळे मुबलक अन्नधान्याचा पुरवठा असताना महारष्ट्रातील लोकांना उपाशी राहावे लागते आहे . शेतक-यांचा शेत माल बाजारता एकाच वेळी येतो तेव्हा तो माल शासन खरेदी करून साठवुन ठेवते . परंतु त्याची दिर्घकाळ देखभाल न केल्यामुळे त्याची फार मोठया प्रमाणात नासाडी होते . गहु व तादंळाची साठवणुक करण्यासाठी महाराष्ट्रात ब-याच गोदामाची व्यवस्था केली आहे . परंतु त्या गोदामामध्ये साठवुन ठेवलेला अन्नधान्याची काही दिवसानी नासाडी होत आहे . अलीकडील काळात महाराष्ट्रात अन्नधान्याची सर्वाधिक (ब्रिटशाच्या काळातील) व्यवस्था असलेल्या मनमाड येथील गोडावुनमधील नासाडी दृष्टीपथास येते . मनमाडमध्ये पाच लाख 84 हजार मेट्रिक टन साठवणुक क्षमता असलेल्या गोडावुनमध्ये सायलोचा व सिलो बॅगच वापर न केल्यामुळे तसेच रेल्वे प्लॅटफार्मवर उघडयावर ठेवल्यामुळे धान्याची मोठया प्रमाणात नासाडी होत आहे . पावसामुळे माल कुजणे, गहु व तादंळाचे पीठ होणे, उंदिर तसेच घोणस लागणे, इ . प्रकार घडत आहेत . हीच स्थिती संपुर्ण राज्यात दिसुन येते . देशपातळीवरील याबाबतची आकडेवारी अशी सांगते की, 2008 - 09 मध्ये देशात 21,000 तर 2009-11 च्या दरम्यान 13,000 टन तर गेल्या वर्षी तीन हजार टन धान्य वाया गेल्याचा अहवाल खुद्द शासनाने लोकसभेत सदर केले . एकटया महाराष्ट्रात एक हजार तीनशे पन्नास टन धान्य गोदामात सडले . त्यामुळे सर्वाच्च न्यायालयने शासनाला ताकिद देवुन सांगितले की, "धान्य सडुन जाण्यापेक्षा गरीब लोकांना वाटून द्या . "

शासनाच्या निष्काळजीपणामुळे सार्वजनिक वितरण व्यवस्थेत अनेक दोष निर्माण झलेले आहेत . त्यात राजकारणाचा हस्तक्षेप वाढल्यामुळे त्यात भ्रष्टाचाराला वाव मिळाला आहे . म्हणुन जे गरीब नाहीत अशानाही पिवळे कार्ड मिळत आहेत . परीणामी जे मुळाते गरीब आहेत त्यांना या वितरण व्यवस्थेचा लाभ मिळत नाही . शिवाय जे अन्नधान्य मिळते ते गुणात्मक दर्जाचे नसते . म्हणुन वर्तमान काळात सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये अधिक कार्यक्षमता निर्माण करण्यास वाव आहे . 16 नोव्हेंबर 2000 साली दीर्घकालीन व्यवस्थापनासाठी एक उच्चस्थरीय समिती स्थापन केली होती . या समितीने अनेक महत्वाच्या शिफारशी केल्या . त्या शिफारशीची अमलबंजावणी केल्यास निश्चितच सार्वजनिक वितरण व्यवस्थेत कार्यक्षमता येईल .

सन 2005- 08, 2009 -10 आणि 2011 अशा तीन अपात्र बबब्बब/बब्बब /ब बब्ा शिधापत्रिका मोहिम राबवण्यात आल्या आहेत . या तीन मोहिमेमध्ये शोधुन काढलेल्या अपात्र शिधापत्रिका 2005 08 एकुण (अंत्योदय + बी . पी . एल . + ए . पी . एल . + अन्नपुर्णा + शुभ्र शिधापत्रिका ) 29,45,914 अपात्र शिधापत्रिका , 2009 - 10 मध्ये 12,75,482 अपात्र शिधापत्रिका तर सन 2011 मध्ये 1,19,450 अपात्र शिधापत्रिका रद्द करण्यात आल्या आहेत . फेब्रूवारी 2013 मध्ये संसदेत अन्न सुरक्षा कायदयात अधिक सुधारणा करण्यासाठी चर्चा करण्यात आली . त्यात अनेक महत्वपुर्ण तरतुदी करण्यात आल्या . अर्थातच यातुन सार्वजनिक वितरण व्यवस्था कार्यक्षम होत असल्याचे दिसुन येते .

थोडक्यात अलीकडील काळात शासन या व्यवस्थेकडे सकारात्मदृष्टीकोनातुन बघत आहे . त्यामुळे काही प्रमाणात का होईना परंतु गरिबांना न्याय मिळत असल्याचे दिसुन येते .

संदर्भ

1 . भारतीय अर्थव्यवस्था (विपुल प्रकाशन, मुंबई) - स . वा . गोखले, नीता पाठक , दि . सो . भिडे
2 . आर्थिक पाहणी 2010 - 11
3 . आर्थिक पाहणी 2011 - 12
4 . महाराष्ट्राचा आर्थिक पाहणी 2010 - 11
5 . वेब साईड - अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

# Publish Research Article
# International Level Multidisciplinary Research Journal For All Subjects

Dear Sir/Mam,

We invite unpublished research paper.Summary of Research Project,Theses,Books and Books Review of publication,you will be pleased to know that our journals are

## Associated and Indexed,India

- ✶ International Scientific Journal Consortium Scientific
- ✶ OPEN J-GATE

## Associated and Indexed,USA

- Google Scholar
- EBSCO
- DOAJ
- Index Copernicus
- Publication Index
- Academic Journal Database
- Contemporary Research Index
- Academic Paper Databse
- Digital Journals Database
- Current Index to Scholarly Journals
- Elite Scientific Journal Archive
- Directory Of Academic Resources
- Scholar Journal Index
- Recent Science Index
- Scientific Resources Database

Indian Streams Research Journal
258/34 Raviwar Peth Solapur-413005,Maharashtra
Contact-9595359435
E-Mail-ayisrj@yahoo.in/ayisrj2011@gmail.com
Website : www.isrj.net